दि.कि.अर्ज क्र.७१९/२०२२
अन्नपूर्णा वि. कोंडाबाई
जाबदार क्र ३ तर्फे सा.क्र. १(नि.क्र.८६ )



<u>उलटतपास अर्जदारातर्फे श्री. व्ही एस शेळके वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>

सदरचे प्रकरण अन्नपूर्णाने कशासाठी दाखल केले आहे, हे मला माहित नाही, हे खरे आहे. मी या प्रकरणी काय उत्तर दिले आहे, हे मला माहित आहे. दत्तात्रय, कोंडाबाई आणि हरीबाई यांचे जन्मवर्ष मला सांगता येत नाही. हे खरे की, कोंडाबाईचे माहेर हिप्पळगाव ता अहमदपूर हे आहे. माझ्या वडीलांच्या आईचे नांव जिजाबाई होते. १९५१ साली जिजाबाई, कोंडाबाई आणि दत्तात्रय यांची नोंद जनगणनेमध्ये होती, हे म्हणणे खरे नाही. हे खरे की, हरीबाई ही दत्तात्रय ची पत्नी आहे अशी नोंद १९५१ साली कोठेही नाही. हे खरे की, कोंडाबाई ही दत्तात्रय ची विधवा आहे. १९५१ च्या जणगणना यादीला मी किंवा हरीबाई यांनी कोठेही आव्हान दिलेले नाही, हे खरे आहे. हे खरे की, हरीबाईने तिचे नांव दत्तात्रयची पत्नी म्हणून नोंदवावे असा अर्ज कोठेही दिलेला नाही. हे खरे की, हरीबाईच्या जन्माची आणि विवाहाची नोंद कोठेही नाही. हरीबाई आणि दत्तात्रय च्या विवाहाची लेखी नोंद, त्याचे वर्ष आणि ठिकाण कुठेही नोंदअसल्याबाबत माझ्या म्हण्यात आणि सरतपासात नाही, हे म्हणणे खरे आहे. मी सांगतो की वर्षाची नोंद आहे. हरीबाईच्या विवाहाचे प्रमाणपत्र आणि तिच्या लग्नातील पुरोहीताचे नांव याचा उल्लेख माझ्या म्हणण्यात व सरतपासात नाही हे म्हणणे खरे आहे. हरीबाई व दत्तात्रय यांच्या विवाहाला कोणकोण नातेवाईक हजर होते, त्यांचा उल्लेख मी सरतपासात व जबाबात केलेला नाही, हे म्हणणे खरे आहे. हरीबाईनी दत्तात्रय सोबत दुसरा विवाह केला, असा उल्लेख कैफियतेत नाही, हे खरे नाही.

हे खरे की, पुर्वी थोरले, मधवे, आणि खालचे असे तीन प्रकार पत्नीचे बाबतीत होते. हे खरे नाही की, सर्वश्रूत आणि जनमुखात कोंडाबाई हीच थोरली पत्नी म्हणून वावरली जायची. हे खरे नाही की, कोंडाबाई ही दत्तात्रय ची विधवा म्हणून नातेवाईकांमध्ये ओळखली जाते. १९५१ साली माझा जन्म झाला नव्हता. हे खरे की, १९५१ साली माझे वडिलांनी कोणत्या रजिस्टरला कसल्या नोंदी

केल्या, हे मला माहिती नाही. कुटूंबप्रमुख म्हणून दत्तात्रय यांनी केलेल्या नोंदी या पुढे आम्ही मान्य केल्या. २०१७ साली माझे वय किती होते, हे मला आठवत नाही. माझा जन्म १९६४ सालातील आहे, हे खरे नाही. माझ्या शाळेच्या प्रवेशाच्या वेळी माझ्या वडिलांनी माझ्या जन्माचा दाखला किंवा ग्रामपंचायतीतील जन्मउता-याची नोंद दाखवली किंवा कसे, हे मला माहिती नाही. मी माझ्या जन्माच्या नोंदीचा उतारा दाखल करु शकत नाही. हे खरे नाही की, मी दाखल केलेली माझी जन्मतारीख मोघम आहे. हे खरे की, माझी जन्माची तारीख व निर्गम उता-यावरील नोंद ही वडिलांनी केलेली आहे.

हे खरे की, २०१७ साली नविन मतदार यादी तयार झाली. हे खरे की त्या यादीत हरीबाईचे वय ८१ वर्षे दाखवले. हरीबाई ही दिनांक २५/१२/२०१६ ला मयत झाली, हे खरे आहे. २०१७ च्या यादीमध्ये हरीबाईचे वय ८१ वर्षे आहे, असे मी दाखविले. हरीबाई २०१७ साली ६६ वर्षांची होती, हे खरे नाही. १९५१ साली हरीबाई फक्त ९ वर्षांची होती, हे खरे नाही.

माझ्या पत्नीचे नांव गंगाबाई आहे, हे खरे आहे. माझे व तीचे लग्न १९७४ साली झाले. १९७४ साली मी १४ वर्षांचा होतो. गंगाबाई ही पाच वर्षांची होती. १९८० साली मला पहिली मुलगी मिरा ही झाली. माझा दुसरा मुलगा ज्ञानराज याच्या जन्माची तारीख मला आठवत नाही. दत्तात्रय च्या पश्चात घरातील सर्व व्यवहारांचे लिखापढीचे काम मला करावे लागायचे, हे खरे नाही. हे खरे की, माझे वडिल दत्तात्रय यांचा गावातील शाळेच्या जमीनीबाबत वाद चालू होता. दत्तात्रय मयत झाल्यावर त्या दाव्यांचे पैरवीचे काम मी व माधव करीत होतो, हे म्हणणे खरे आहे. त्याकामी माझा आणि वकिलांचा संबंध आला नाही. हे खरे नाही की, कोंडाबाई हिच पहिली पत्नी आहे, असे मला समजल्यांनतर मी हरीबाई आणि माझ्या वयांमध्ये कागदोपत्री वाढ केली. हे खरे की, दत्तात्रय व हरीबाई यांच्या मृत्यूबददल ते मयत झाल्यापासून मला माहिती होते. त्यांच्या पश्चात त्यांचे

वारस म्हणून ठरवून घेण्यासाठी मी कुठेही अर्ज का केला नाही, याचे कारण की, मला तसे करण्यास माधवने अडथळा आणला. दत्तात्रय मयत झाल्यापासून २०२० सालापर्यंत मला न्यायालयातून वारस दाखला घेण्यासाठी अन्नपूर्णा आणि माधवची अडचण होती, हे म्हणणे खरे नाही. कोंडाबाई आणि माधव हे दत्तात्रय चे वाारस आहेत. हे म्हणणे खरे नाही. हे खरे की, कोंडाबाईस दत्तात्रय पासून माधव आणि अन्नपूर्णा ही अपत्ये झाली. हे खरे की, हा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून पहिल्यांदा कोंडाबाईनेच दिला आहे. हे खरे नाही की, कोंडाबाई, माधव व अन्नपूर्णा हे एवढेच दत्तात्रय चे वारस आहेत. कोंडाबाई ही पहिली पतनी हयात असताना दत्तात्रय नी हरीबाईशी दुसरा विवाह केला, हे खरे नाही. १९५१ पुर्वीपासून कोंडाबाई व दत्तात्रय यांचे विवाहनाते कायम आहे, हे खरे नाही. हरीबाईने दत्तात्रय सोबत विवाह करण्यासाठी कायदयाची बाधा होती व ती अज्ञानसुध्दा होती, हे म्हणणे खरे नाही. २००१ ची मतदार यादी व २०१७ ची मतदार यादी यात आमच्या कुटूंबाच्या प्रत्येक सदस्याच्या वयात चार वर्षांची वाढ आहे, हे खरे नाही. २००१ व २०१७ च्या मतदार यादीत माझी पत्नी गंगाबाई हिचे वय अंदाजाने दाखविले आहे, हे खरे आहे. हरीबाईच्या लग्नानंतर मी सहा वर्षांनी तीच्या पोटी जन्माला आलो.

माझे गावातील कोणाशीही कुठल्याही स्वरुपातील वाद नाहीत. भाउराव आगलावे आणि माझे संबंध चांगले आहेत. भाउराव आणि दत्तात्रय चे यांचेही संबंध चांगले होते, हे म्हणणे खरे नाही. भाउराव आगलावे आमच्याच गावातील असल्याने ते मला व माझ्या कुटूंबीयांना ओळखतात हे म्हणणे खरे आहे. भाउराव आगलावे यांच्यासमोर दत्तात्रय आणि कोंडाबाईचा विवाह झाला, हे म्हणणे खरे नाही. अन्नपुर्णाचा जन्म १९५६ सालातील आहे, हे खरे नाही. आपण हरीबाई या दत्तात्रय या दुस-या पत्नीची मुले असल्याने आपल्याला वारस दाखला मिळू शकणार नाही, हे माहित असल्याने सन २००३ ते २०२० या काळात मी वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केला नाही, हे खरे नाही. हे खरे की, मतदार यादया

बनविणारे शासकिय कर्मचारी मतदार यादी तयार करताना कागदोपत्री पुरावा मागत नाहीत. हे खरे की, सांगितलेले वय ते यादीत नोंदवतात. सन २००१ सालच्या मतदार यादीत माझे वय ३३ वर्षे दाखविलेले आहे. सन २०१७ साली माझे मतदार यादीत वय ५३ वर्षे दाखविले, हे मला माहित नाही. २००१ च्या मतदार यादीत हरीबाईचे वय ६१ वर्षे व २०१७ सालच्या मतदार यादीत तीच्या मृत्यूनंतर तिचे वय ८१ वर्षे दाखविले हे खरे आहे. २०१७ सालच्या यादीमध्ये माझे, हरीबाईचे वय चार - चार वर्षांनी कसे वाढले, हे मला सांगता येत नाही. दत्तात्रयची शिधापत्रीका तयार होताना दत्तात्रय, कोंडाबाई, हरीबाई अशी नांवे क्रमाने आली, हे म्हणणे खरे नाही.

हे खर की, मी वारस दाखला मिळण्यासाठी कायदयान्वये अभिप्रेत नमुन्यात अर्ज केलेला नाही. हे खरे की, कायदयान्वये जाहिर प्रगटन करुन, वारस दाखल्याची स्वतंत्र मागणी मी केलेली नाही. हे खरे की, जबाबदाव्यात माझी वारस दाखल मिळण्यासाठी कधी कोणी व कुठे आडवणुक केली याचा उल्लेख नाही. अन्नपूर्णाचा अर्ज नामंजूर करता येण्याइतपत पुरावा मी दाखल केलेला नाही, हे खरे आहे. हे खरे की, अन्नपूर्णा ही माझ्यासोबत प्रेमाने व चांगल्या संगोपन करण्याच्या हेतूने वागत होती. शासनाने दत्तात्रयच्या नांवे दिलेला संपादीत जमीनीचा मावेजा, पिकविमा, अनुदान २००३ सालानंतर आजअखेर उचललेला नाही. हरीबाईच्या हयातीपर्यंत तीने व आजअखेर मी कोंडाबाई ही दत्तात्रय ची पहिली पत्नी नाही, असा उजर घेतलेला नाही, हे खरे आहे. हे खरे की, विजयालक्ष्मीच्या नांवे असलेली मिळकत ही माझ्या आजोबांपासून चालत आलेली मिळकत आहे. हे खरे की, विजयालक्ष्मीच्या नांवे असलेली मिळकत ही अर्जदार व जाबदार यांची आहे. सरतपासातील मजकूर खोटा आहे, हे खरे नाही. दत्तात्रयच्या पहिल्या पत्नीचे आम्ही वारस नाहीत, हे खरे नाही. हरीबाईचा विवाह १९५४ साली झाला ही बाब फक्त आणि फक्त न्यायालयातच पहिल्यांदा सांगितले, यास माझे सांगणे की, तसे मला वडिल

सांगत होते. हरीबाईचा विवाह १९५४ साली झालेला नसून १९५५ नंतर झाला आहे, हे म्हणणे खरे नाही. १९५४ साली हरीबाई व दत्तात्रय यांचा विवाह झाला ही मला माहिती नाही, यास माझे सांगणे की, माझ्या वडिलांनी मला तसे सांगितले. १९५१ साली कोंडाबाई आणि दत्तात्रय हे विवाहीत होते, असेही मला वडिलांनी सांगितले होते हे खरे नाही. १९५१ च्या जनगणनेची यादी खोटी आहे. हे खरे आहे की, हरीबाई, दत्तात्रय, कोंडाबाई यांच्या जन्माबददलची माहिती मला नाही. गैरलाभ मिळावा म्हणून कोंडाबाई व दत्तात्रय यांचा विवाह १९५४ साली झाला असे मी म्हणतो, हे म्हणणे खरे नाही. आम्ही दत्तात्रयचे वारस होवू शकत नाही, हे म्हणणे खरे नाही. हे खरे की, दत्तात्रय चा वारस म्हणून कूठेही त्यांचा नावाचा फायदा, उपभोग किंवा विनियोग केलेला नाही. हे खरे नाही की, विरोधाला विरोध म्हणून मी फक्त या प्रकरणी उत्तर दिले. याकामी मी साक्षीदारांची यादी दाखल केलेली नाही, याचे कारण की तसा साक्षीदार मला मिळत नाही हे आहे, हे खरे नाही. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटा जवाब देतो.

**अर्जदारातर्फे उलटतपास पुर्ण.**

जाबदार क्र १,२ साठी सदर उलटतपास श्री एस व्ही देशमुख विधीज्ञ यांनी स्वीकारला.

**उलटतपास पुर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक १०/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर